महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२९ वे | दिनांक : १४/०८/२०२६ | वार : शुक्रवार

## पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला



**नांदेड :** मध्ये शिरोमणी अकाली दलाचे (SAD) अध्यक्ष आणि पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर गुरुवारी हल्ला करण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार, नांदेड येथील गुरुद्वारा माता साहिब कौरमध्ये एका निहंगाने त्यांच्यावर कृपाणाने हल्ला केला. या हल्ल्यात बादल यांच्या हाताला दुखापत झाली आहे, तर त्यांच्या सुरक्षेत तैनात असलेला एक पोलिस कर्मचारीही जखमी झाला आहे.

माहितीनुसार, सुखबीर सिंग बादल कुटुंबासह नांदेडला पोहोचले होते आणि गुरुद्वारा माता साहिब कौरमध्ये प्रार्थनेसाठी गेले होते. याच दरम्यान तेथे उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला.

हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडचे पोलिस अधीक्षकांशी संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. हल्लेखोराला तातडीने अटक करण्यात आल्याची माहिती त्यांना देण्यात आली. हल्ल्यामागील नेमके कारण काय आहे, याचा सखोल तपास करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना दिले असून, सुखबीर सिंग बादल यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडमध्ये झालेल्या हल्ल्याचा आमदार अंबादास दानवे यांनी तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. हल्ला करणाऱ्या संशयिताला पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतले असले, तरी या हल्ल्यामागील नेमके कारण आणि संभाव्य कटाचा सर्व बाजूंनी सखोल तपास करावा, अशी मागणी दानवे यांनी केली.

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर झालेल्या हल्ल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतली आहे. शिंदे यांनी बादल यांच्या पत्नी व खासदार हरसिमरत कौर बादल यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत सुखबीर सिंग बादल यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच या हल्ल्यातील दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नसून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यानंतर शिंदे यांनी नांदेडचे पोलिस अधीक्षकांशी संपर्क साधून घटनेचा आढावा घेतला आणि सुरक्षेतील त्रुटींसह संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले.

हल्ल्यादरम्यान बादल यांच्या हाताला दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्यासोबत असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यानेही हल्लेखोराला थांबवण्याचा प्रयत्न केला, ज्यात तोही जखमी झाला. घटनेनंतर सुखबीर बादल यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्या प्रकृतीबाबत सविस्तर वैद्यकीय अहवालाची प्रतीक्षा आहे.

घटनेनंतर घटनास्थळी उपस्थित सुरक्षा कर्मचारी आणि इतर लोकांनी हल्लेखोराला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. हल्ल्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

सुखबीर सिंग बादल यांच्यासारख्या मोठ्या राजकीय नेत्यावर धार्मिक स्थळी धारदार शस्त्राने हल्ला झाल्यानंतर सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून, घटनेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींकडून माहिती गोळा केली जात आहे.

४ डिसेंबर २०२४ रोजी अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात (गोल्डन टेंपल) सुखबीर सिंग बादल यांच्यावर खलिस्तानी दहशतवादी नारायण सिंह चौडा याने गोळीबार केला होता. त्यावेळी बादल हे सुवर्ण मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ सेवादार म्हणून धार्मिक सेवा बजावत होते.

गोळीबार होताच साध्या वेशातील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत हल्लेखोराचा हातवर ढकलला. त्यामुळे गोळी बादल यांना न लागता मंदिराच्या भिंतीवर जाऊन आदळली. या हल्ल्यात सुखबीर सिंग बादल थोडक्यात बचावले होते.

## देशात लोकांना बोलण्यापासून रोखलं जातंय- राहुल गांधी



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी आरोप केला की, सरकार लोकांना त्यांचे म्हणणे मांडण्यापासून रोखत आहे. सरकारला व्यवस्था लागू करायची आहे, तर काँग्रेसचे काम भारताला आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे आहे.

दिल्लीत सुरू असलेल्या काँग्रेसच्या 'रचनात्मक काँग्रेस प्रकोष्ठ'च्या अधिवेशनात राहुल गांधी म्हणाले की, जंतर-मंतरवर विद्यार्थी आपले म्हणणे मांडू इच्छित होते.

विद्यार्थी त्रस्त होते आणि त्यांना आपली व्यथा मांडायची होती, परंतु सरकारने त्यांना तसे करण्यापासून रोखले. सरकारला हे समजले आहे की, लोक आता शांत राहणार नाहीत.

•राहुल गांधी म्हणाले की, त्यांचे प्रयत्न सरकारला त्रास देऊ शकतात. त्यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदी रात्री झोपू शकत नाहीत.

•केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना कधीकाळी चाणक्य आणि सरदार पटेल यांसारख्या नावांनी संबोधले जात होते, पण आता ते संसदेत प्रवेशही करू शकले नाहीत. असे यासाठी झाले आहे कारण पहिल्यांदाच त्यांना भारताच्या आवाजाला आणि त्याच्या अभिव्यक्तीला सामोरे जावे लागत आहे.

•भारतात अनेक लोक भित्र्यांसारखे वागत आहेत. जर तुम्ही ब्रिटिश साम्राज्याशी लढत असाल आणि भीती वाटत असल्याचे म्हणत असाल तर ते समजण्यासारखे आहे, पण आज तुम्ही त्या विदूषकांशी आणि जोकरांशी लढत आहात, ज्यांना आपल्या तत्वज्ञानाचे किंवा इतिहासाचे कोणतेही ज्ञान नाही.

•जर एखाद्या दिवशी आरएसएसच्या अभिव्यक्तीला संपवण्याची वेळ आली, तर ते तिचेही रक्षण करतील.

रचनात्मक काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन 12 ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील इंदिरा भवनात सुरू झाले होते. यात सामाजिक संघटना, कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, शैक्षणिक क्षेत्रातील लोक, कलाकार, समुदाय प्रतिनिधी आणि नागरिक समाजाशी संबंधित लोकांनी भाग घेतला.

पहिल्या दिवशी अर्थव्यवस्था, रोजगार, गरिबी आणि असमानता, पर्यावरण, विकास, विस्थापन, प्रदूषण, शिक्षण, आरोग्य, न्याय, अधिकार, संस्कृती आणि संशोधन यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. अधिवेशनात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे देखील उपस्थित होते.

## रायगडच्या पालकमंत्रिपदावर दोन दिवसांत निर्णय? : भरत गोगावले यांचे सूचक विधान



**मुंबई :** राज्यातील प्रलंबित पालकमंत्री नियुक्त्यांबाबत पुन्हा एकदा चर्चा रंगली असताना शिवसेना (शिंदे गट) नेते आणि आमदार भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत महत्त्वाचे संकेत दिले आहेत. पुढील दोन दिवसांत याबाबत निर्णय होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी आपण अद्यापही आशावादी असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या प्रश्नावर लवकरच पडदा पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

माध्यमांशी संवाद साधताना भरत गोगावले म्हणाले की, "अजून दोन दिवस बाकी आहेत. त्या कालावधीत निर्णय होऊ शकतो. जे ठरलेलं आहे ते ठरलेलं आहे. त्यात कोणती अडचण आहे असं मला वाटत नाही. मात्र याबाबत अंतिम माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करूनच सांगू शकतो." गोगावले यांच्या या वक्तव्यानंतर रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबतच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे.

येत्या 15 ऑगस्ट रोजी रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात भरत गोगावले सहभागी होणार असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर पालकमंत्रिपदाबाबत दोन दिवसांत निर्णय होऊ शकतो, असे संकेत त्यांनी दिले. त्यामुळे स्वातंत्र्यदिनापूर्वीच सरकारकडून अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पालकमंत्रिपदाच्या प्रश्नावर विचारले असता गोगावले यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "मी अजूनही आशावादी आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडून संपूर्ण माहिती घेऊनच पुढे बोलणार आहे."

त्यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेनेच्या शिंदे गटाकडून रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी प्रयत्न सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवरही भरत गोगावले यांनी प्रतिक्रिया दिली. राऊत यांनी निवडणूक आयोगाने दबावाखाली शिवसेना फोडली आणि पक्ष-चिन्हाबाबतचा निर्णय घेतल्याचा दावा केला होता. त्यावर गोगावले म्हणाले, "संजय राऊत रोज सकाळी माध्यमांना काय बोलायचं याचा विचार करून वक्तव्य करतात. त्यांनी आतापर्यंत जे बोललं, त्याच्या उलटच घडताना महाराष्ट्राने पाहिलं आहे." तसेच शिवसेना पक्ष-चिन्ह प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयीन सुनावणीचाही उल्लेख करत त्यांनी निकाल ठाकरे गटाच्या विरोधात जाईल, असा दावा केला.

गोगावले यांनी रोजगार सेवकांच्या प्रलंबित मानधनाच्या मुद्द्यावरही भाष्य केले. रोजगार सेवकांना 8 हजार रुपये मानधन आणि 2 हजार रुपये भत्ता देण्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, संबंधित प्रस्तावावर उपमुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी झाली असून आता मुख्यमंत्री स्तरावरील मंजुरी बाकी आहे. ती मिळाल्यानंतर निधी वितरित करण्यात येईल.

"रोजगार सेवकांचे सतत फोन येत आहेत. आम्ही त्यांना समजावून सांगत आहोत. काही दिवसांत त्यांचे मानधन आणि थकीत रक्कम वितरित केली जाईल," असेही त्यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारमध्ये विविध जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदावरून अधूनमधून राजकीय चर्चा होत असतात. रायगड हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा मानला जात असल्याने येथील पालकमंत्रिपदावर कोणाची नियुक्ती होते याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. भरत गोगावले यांच्या ताज्या वक्तव्यानंतर पुढील दोन दिवसांत सरकारकडून काही महत्त्वाची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अखेर सुटतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पावसाळी क्रीडा महोत्सव; विद्यार्थ्यांनी घेतली 'नशामुक्त भारत' ची शपथ



**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाने आयोजित केलेल्या पावसाळी क्रीडा महोत्सवामध्ये जवळपास पाचशे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारत ची शपथ घेतली.मोबाईल गेम्स च्या विळख्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मैदानी खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, अंगी शिस्त बाणावी, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित व्हावी यासाठी या पावसाळी क्रीडा महोत्सवाचे दरवर्षी आयोजन केले जाते. या क्रीडा महोत्सवाचे उदघाटन राष्ट्रीय खेळाडू आणि उमरगा रोटरी क्लब चे अध्यक्ष अनिल मदनसुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी मैदानी खेळाचे आपल्या जीवनातील अनन्यसाधारण महत्व विषद करताना खेळामुळे सुदृढ शरीरासोबतच सक्षम मन तयार होण्यास कशी मदत होते यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. या क्रीडा महोत्सवात १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावणे, रिले, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, व्हॉलीबॉल, कबड्डी अशा विविध मैदानी क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याचबरोबर महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहण्याची तसेच समाजात नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याची शपथ घेतली. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. देवरकर उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.जी. एस. मोरे, उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले, पर्यवेक्षक एस. ए. महामुनी हेही यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डी. डी. पांढरे तर आभार प्रा.सुजित शिंदे यांनी मानले. क्रीडा विभागाचे प्रशिक्षक म्हणुन प्रा. जी बि गायकवाड, प्रा. बालाजी सुरवसे यांनी काम पाहिले. सदरील स्पर्धेसाठी पंच म्हणुन प्रा डॉ राजेंद्र सूर्यवंशी यांनी काम केले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इकरा पब्लीक स्कूलमध्ये 'नशा मुक्त भारत अभियाना' चा एल्गार; विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा







**जळगाव :** अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी आणि त्यांनी निरोगी व व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारावी, या उद्देशाने इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,जळगाव येथे 'नशा मुक्त भारत अभियाना'अंतर्गत विशेष जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या सहकार्याने हे 'व्यसनमुक्ती प्रतिज्ञा अभियान' पार पडले.केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयांतर्गत असणाऱ्या 'नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो' (NCB) द्वारे देशभरात ६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'नशा मुक्त भारत अभियान' राबवले जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून इकरा पब्लिक स्कूलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या तेजल दिदी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "सशक्त आणि निरोगी भारताच्या निर्मितीसाठी तरुण पिढीने अमली पदार्थांपासून दूर राहणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी आयुष्यात योग्य व जबाबदार पर्यायांची निवड करून स्वत:सोबतच समाजालाही व्यसनमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा."तेजल दिदी यांच्या प्रबोधनानंतर शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्त राहण्याची आणि समाजाला व्यसनमुक्त ठेवण्यासाठी कटिबद्ध राहण्याची औपचारिक प्रतिज्ञा घेतली.या उपक्रमाचे कौतुक करताना शाळेचे प्राचार्य शेख शकील म्हणाले, "विद्यार्थ्यांना योग्य दिशेने नेण्यासाठी,त्यांच्यात शिस्त,ध्येय आणि मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी अशा प्रकारचे प्रबोधनात्मक कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात."या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत नवीन ऊर्जा आणि सकारात्मक संदेश पसरला.

## मुरूममध्ये भव्य ऐतिहासिक तिरंगा रॅली संपन्न; सहा हजारांहून अधिक विद्यार्थी, माजी सैनिक व नागरिकांचा अभूतपूर्व सहभाग



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचा संदेश देण्यासाठी शहरात गुरुवारी (ता. १३) रोजी तिरंगा रॅली काढण्यात आली. राष्ट्रध्वजाजबद्दलचा अभिमान आणि देशप्रेमाची भावना मनात जागवत विद्यार्थी, माजी सैनिक, भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले. शहरातील विविध शाळा, महाविद्यालय मिळून जवळपास ६००० च्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.शहरात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना समितीचे सहअध्यक्ष शरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित फेरीची सुरवात नगरपरिषद कार्यालयापासून करण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी, माजी सैनिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत फेरी महात्मा बसवेश्वर चौक येथे पोहोचली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली. जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना समितीचे सहअध्यक्ष शरण पाटील, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव जाधव गुरुजी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, श्रीराम नाडे, माजी सैनिक राजेंद्र बेंडकाळे, व्यंकट चौधरी, हनुमंत दुधगे, राजकुमार हिरेमठ, गुलाब अंबुसे, गटनेते गणेश अंबर, डॉ. सतीश शेळके, प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. महेश्वर होगाडे, मुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, मुख्याध्यापिका खतीब सय्यदा खुतेजा बेगम, अनुराधा जोशी, विजयकुमार देशमाने, दयानंद पाटील, राजशेखर कोरे, उपप्राचार्य उमाकांत महामुनी, सुभाष राठोड, सोनाली कलशेट्टी सर्व नगरसेवक यांच्यासह श्री माधवराव पाटील महाविद्यालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, नूतन प्राथमिक शाळा, डॉ. झाकीर हुसेन हायस्कूल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, जिल्हा परिषद कन्या प्राथमिक, जिल्हा परिषद मुलांची शाळा, नगर परिषद, विविध विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, कर्मचारी वृंद, विविध संस्थांचे पदाधिकारी हजारोच्या संख्येने उपस्थित होते. रॅलीच्या यशस्वी आयोजनामुळे मुरुम शहरात देशभक्तीचा आणि शिस्तीचा एकोपा दिसून आला, ज्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६


## उत्सव स्वातंत्र्याचा

पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिन,
चला आनंदाने साजरा करू.
सण स्वातंत्र्य उत्सवानिमित्त,
मनात विकासाची कास धरू.

क्रांतिवीरांच्या बलिदानाने,
देशाला स्वातंत्र्य मिळाले.
क्रांतिवीरांचे त्याग समर्पण,
पाहून इंग्रज सारे पळाले.

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी,
हसत हसत फासावर चढले.
एक मुखाने इन्कलाब म्हणत,
क्रांतिवीर एकजुटीने लढले.

क्रांतीची मशाल पेटवून,
दिला इन्कलाब चा नारा,
इन्कलाब चा नारा ऐकून,
निनादला आसमंत सारा.

चला आठवूनी क्रांतिवीरांना
स्वातंत्र्योत्सव साजरा करू.
स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी,
भ्रष्टाचाराशी युद्ध आपले सुरू.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## अब्दीमंडीत कृपाप्रसाद गणपती मंदिरात चोरी; दानपेटीतून १५ हजार लंपास




**दौलताबाद (जावेद अहेमद) :** अब्दीमंडी येथील कृपाप्रसाद गणपती मंदिराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केला. त्यानंतर दानपेटीचे लॉक तोडून १५ हजार रुपये लंपास केलेअब्दीमंडी किशोर लक्ष्मीकांत नाईक तसेच ते मंदिरात पुजारी व मंदिर अध्यक्ष आहे त्यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहेनाईक यांनी नेहमीप्रमाणे ११ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजता मंदिराच्या मुख्य दरवाजाला कुलूप लावून ते घरी गेले होते. १२ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे चार वाजता ते पूजेसाठी मंदिरात आले असता मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. दरवाजाची कडी उघडून त्यांनी मंदिरात प्रवेश केला असता दानपेटीचे लॉकही तोडलेले दिसून आले. दानपेटीतील रोकड चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.त्यानंतर त्यांनी मंदिराचे सचिव नरेंद्र हजारी दोघांनी मंदिराची पाहणी केली. त्यावेळी दानपेटीतील रोकड चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. दानपेटीत विविध मूल्यांच्या चलनी नोटा तसेच नाणी मिळून अंदाजे १५ हजार रुपये चोरी झाले असल्याचे दिसून आले आहेअज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी मंदिराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दानपेटीचे लॉक तोडून त्यातील रोकड स्वतःच्या फायद्यासाठी चोरून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या प्रकरणी किशोर लक्ष्मीकांत नाईक यांनी दौलताबाद पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

## ईश्वरी ज्ञानाची जाणीव करून देणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय - प्रा. केशवराव शिंदे




**उदगीर :** सध्यकालीन दु:खातून समाजासाठी उपलब्ध तत्त्वज्ञानाचा समृद्ध, संपूर्ण सौख्याचा लाभ करून देण्यासाठी व पृथ्वीच्या पाठीवरील अभूतपूर्व दर्शनशास्त्रच्या ईश्वरी ज्ञानाची जाणीव करून देणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी हा होय असे मत ह. भ. प. प्रा. केशवराव शिंदे यांनी व्यक्त केले. चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या पंधरा वर्षापासून सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादचे 366 वे पुष्प ह . भ.प. तुकाराम धुमाळे यांच्या अध्यक्षतेखाली ह. भ. प. प्रा. केशवराव शिंदे यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान संस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी प्रकाशित केलेल्या ज्ञानेश्वरी पारायण प्रत या ग्रंथावर संवाद साधून गुंफले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, धर्मग्रंथाच्या माध्यमातून ईश्वरीय ज्ञान साऱ्या जगाला देण्याचा प्रयत्न ज्या गीतेच्या माध्यमातून करण्यात आला त्या गीतेवर सटीप असे विश्लेषण करून संत ज्ञानेश्वरांनी ते ज्ञान सर्वसामान्यांना कळावे यासाठी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची निर्मिती केली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी या ज्ञानेश्वरीची पारायण प्रत प्रकाशित केली. या पारायण प्रतिच्या माध्यमातून सर्वसामान्यांना ईश्वरी ज्ञानाची प्राप्ती होणार यात काही शंका नाही. अध्यक्षीय समारोप करताना ह . भ.प. तुकाराम धुमाळे म्हणाले की नैतिक अनैतिकतेच्या दलदलीत सर्जनशीलतेची पेरणी ज्ञानेश्वरी या ग्रंथामध्ये मांडलेली आहे. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या वाचक संवादाचे सूत्र संचालन कांता कलबुर्गे यांनी केले. संवादकांचा परिचय प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर यांनी करून दिला तर आभार प्रा. डॉ. नरेंद्र शिंदे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील , हनुमंत मेत्रे , आनंद बिरादार, तुकाराम बिरादार, वीरभद्र स्वामी , गोविंद सावरगावे , सुरेश वजनाम, तुळशीदास बिरादार आदींनी परिश्रम घेतले.

## देशभक्तीच्या जयघोषात मुरूममध्ये भव्य तिरंगा रॅली



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम येथील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) स्वयंसेवक, स्वयंसेविका, विद्यार्थी व शिक्षक यांच्या वतीने मुरूम शहरातून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.या रॅलीचे उद्घाटन भारत शिक्षण संस्थेचे संचालक त्र्यंबक इंगोले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर घोषणांनी मुरूम शहर दुमदुमून टाकले.रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याविषयी आदराची भावना जागृत करण्याचा संदेश दिला. रॅलीदरम्यान 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांनी परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या तिरंगा रॅलीला विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६


# भारतीय शैक्षणिक व्यवस्थेचे भवितव्य

शिक्षण हे केवळ रोजगार मिळविण्याचे साधन नाही, ते सामाजिक परिवर्तनाचे, समान संधीचे आणि लोकशाहीच्या बळकटीकरणाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच भारतीय संविधानाने शिक्षणाला मूलभूत अधिकाराचे स्वरूप दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी शस्त्र मानले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आज प्रश्न असा आहे की, ज्यांच्या नावाने शिक्षणाचा प्रसार करण्याच्या घोषणा केल्या जातात, त्या गरीब आणि ग्रामीण मुलांसाठी शिक्षणाची दारे प्रत्यक्षात किती खुली आहेत?ग्रामीण भारतातील सरकारी शाळा ही गरीब, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांसाठी शिक्षणाची सर्वात मोठी आशा आहे. परंतु अनेक ठिकाणी कमी विद्यार्थीसंख्या, शाळांचे विलिनीकरण, स्थलांतर आणि प्रशासकीय निर्णयांच्या नावाखाली शाळांची संख्या कमी होत आहे. ग्रामीण भागात एक शाळा बंद होणे म्हणजे अनेक मुलांना पुढील गावात किंवा शहरात शिक्षणासाठी जाण्याची सक्ती करणे होय.देशात सरकारी शाळांची संख्या प्रचंड आहे. UDISE+ 2024-25 नुसार भारतात सुमारे 14.71 लाख शाळा आणि 24.69 कोटी विद्यार्थी आहेत. यातील सुमारे 69 टक्के शाळा सरकारी आहेत आणि जवळपास निम्मे विद्यार्थी त्यात शिक्षण घेतात. म्हणजेच सरकारी शिक्षणव्यवस्था अजूनही भारताच्या शिक्षणाचा कणा आहे. मग या कण्यालाच दुर्बल का केले जात आहे?शिक्षकांची कमतरता हा त्यातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. 2023-24 मध्ये देशात 1,10,971 एकशिक्षकी शाळा होत्या. एका शिक्षकाने एकाच वेळी अनेक वर्ग, विविध विषय, प्रशासकीय कामे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा सांभाळाव्यात, अशी अपेक्षा करणे म्हणजे शिक्षणाच्या गुणवत्तेशीच तडजोड करणे होय.यात आणखी भर पडते ती शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांची. निवडणुका, मतदारयाद्या, जनगणना, विविध सर्वेक्षणे आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती केली जाते. राष्ट्रीय महत्त्वाची कामे नक्कीच महत्त्वाची आहेत; परंतु शिक्षक हा शिक्षक राहणार की सरकारी यंत्रणेतील बहुउद्देशीय कर्मचारी होणार? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. शिक्षक वर्गाबाहेर आणि विद्यार्थी शिक्षकाविना—अशी परिस्थिती शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी घातक आहे.ग्रामीण शाळांच्या पायाभूत सुविधांची अवस्थाही अनेक ठिकाणी चिंताजनक आहे. काही शाळांच्या इमारती जीर्ण आहेत, प्रयोगशाळा नाहीत, ग्रंथालये अपुरी आहेत, खेळाची साधने नाहीत, स्वच्छतागृहांची अवस्था समाधानकारक नाही आणि डिजिटल शिक्षणाच्या बाबतीत शहर-ग्रामीण दरी अजूनही मोठी आहे. 2024-25 मध्ये देशातील सुमारे 64.7 टक्के शाळांमध्येच संगणक आणि 63.5 टक्के शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध होती. डिजिटल शिक्षणाच्या युगात ही आकडेवारी अनेक प्रश्न उपस्थित करते.दुसरीकडे शहरांमध्ये आणि मोठ्या गावांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांची संख्या वाढत आहे. पालकांना आपल्या मुलांनी चांगले शिकावे, इंग्रजी बोलावे, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवावे असे वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही अनेक पालक खासगी शाळांची फी, वाहतूक, गणवेश, पुस्तके आणि इतर खर्च सहन करतात. परिणामी शिक्षण हा अधिकार न राहता खरेदी करण्याची वस्तू बनत चालला आहे.याचा सर्वाधिक फटका गरीब कुटुंबांना बसतो. सरकारी शाळा कमकुवत होत गेल्या आणि खासगी शिक्षण महाग होत गेले, तर गरीब मुलांसमोर पर्याय काय उरतो? ग्रामीण भागातील मुलांनी शिकूच नये, अशी व्यवस्था नकळत तयार होत आहे का? हा प्रश्न केवळ भावनिक नाही; तो सामाजिक न्यायाशी संबंधित आहे.उच्च शिक्षणाची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. महाविद्यालयीन आणि व्यावसायिक शिक्षणाचा खर्च वाढत आहे. खासगी विद्यापीठे आणि महाविद्यालयांची फी सर्वसामान्य कुटुंबांच्या आवाक्याबाहेर जात आहे. पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असली तरी रोजगाराच्या संधी त्या प्रमाणात वाढलेल्या नाहीत. त्यामुळे हातात पदवी आणि डोक्यावर बेरोजगारी अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाली आहे.संशोधन क्षेत्रातील प्रश्न तर अधिक गंभीर आहेत. Ph.D. (आचार्य पदवी)करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढणे ही सकारात्मक बाब आहे; परंतु संशोधनाची गुणवत्ता, साहित्यचौर्य, बनावट किंवा निकृष्ट जर्नल्स, संशोधनातील अनियमितता आणि मार्गदर्शनाची गुणवत्ता याबाबत वारंवार प्रश्न उपस्थित होतात. Ph.D. पदवी ही ज्ञाननिर्मितीची सर्वोच्च शैक्षणिक प्रक्रिया असताना ती केवळ पदोन्नती किंवा नोकरीसाठीचे प्रमाणपत्र बनली तर संशोधन संस्कृतीचे काय होणार?विद्यापीठांमध्ये राजकीय हस्तक्षेप, नियुक्त्यांतील पारदर्शकतेचा अभाव, कुलगुरू निवडीवरील वाद, प्राध्यापकांची रिक्त पदे आणि संशोधनासाठी अपुरा निधी या समस्या उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेला बाधा आणतात. विद्यापीठ हे सत्तेच्या हस्तक्षेपाचे केंद्र नव्हे, तर मुक्त विचार, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य आणि ज्ञाननिर्मितीचे केंद्र असले पाहिजे.जागतिक क्रमवारीत भारताच्या काही संस्था निश्चितच पुढे आल्या आहेत, म्हणून देशातील संपूर्ण उच्च शिक्षण व्यवस्था गुणवत्तापूर्ण झाली, असेही म्हणता येणार नाही. भारतासमोर अजूनही जागतिक दर्जाच्या शिक्षणाची गुणवत्ता सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान आहे.शिक्षणासाठी सार्वजनिक खर्च हा या प्रश्नाचा केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षणावरील सार्वजनिक खर्च GDPच्या 6 टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र प्रत्यक्ष खर्च अद्याप त्या पातळीपर्यंत पोहोचलेला नाही. शिक्षणावर खर्च कमी असेल तर चांगल्या इमारती, पुरेसे शिक्षक, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संशोधन सुविधा आणि आधुनिक शिक्षणव्यवस्था कशी उभी राहणार?आज भारतासमोर दोन मार्ग आहेत. एक म्हणजे शिक्षणाला बाजाराच्या हवाली करून आर्थिक क्षमता असणाऱ्यांना उत्तम शिक्षण आणि गरीबांना तडजोडीचे शिक्षण देणे. दुसरा मार्ग म्हणजे शिक्षणाला सार्वजनिक जबाबदारी मानून प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी देणे.सरकारने तातडीने ग्रामीण शाळा बंद करण्याऐवजी त्या सक्षम कराव्यात. रिक्त शिक्षक पदे भरावीत. शिक्षकांना अनावश्यक अशैक्षणिक कामांपासून मुक्त करावे. जीर्ण शाळांच्या इमारतींची पुनर्बांधणी करावी. डिजिटल सुविधा, प्रयोगशाळा आणि ग्रंथालये उपलब्ध करून द्यावीत. उच्च शिक्षणाची फी सर्वसामान्यांच्या आवाक्यात ठेवावी. संशोधनातील गैरप्रकारांवर कठोर कारवाई करावी. विद्यापीठांना शैक्षणिक स्वायत्तता आणि आवश्यक आर्थिक पाठबळ द्यावे.कारण शाळा बंद होणे म्हणजे केवळ एक इमारत बंद होणे नाही; ते एका पिढीच्या स्वप्नांचे दार बंद होणे आहे. आणि जर गरीबांच्या मुलांच्या हातातून शिक्षण निसटले, तर उद्याचा भारत केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर सामाजिक आणि लोकशाहीदृष्ट्याही अधिक विषम बनेल. शिक्षण वाचविणे म्हणजे केवळ शाळा वाचविणे नाही; शिक्षण वाचविणे म्हणजे भारताचे भविष्य वाचविणे होय.


**प्रा. डॉ. संतोष डाखरे**
**अभ्यासमंडळ सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली**
8275291596


# गहन प्रश्न

आज!??
आधारपुरुषंच बांधताहेत .
डोक्याला सोवळ ,
महागाईत अन्
लोकशाहीत जगण्यासाठी... धडपडणाऱ्यांनी कुठवर.
हे सहन करावे?

***गहन प्रश्न** ???*
ज्यांनी लाज लज्जा पाळायची,
तेच तुडवित आहेत ,
सर्रासपणे मानवी मूल्य. निवडणुकीत ,ईव्हीएम सेटिंग.
पळवापळवी ,
मताची किंमत .कवडीतुल्य ...
भविष्यात लोकशाही प्रबळ होणार!?

***गहन प्रश्न** ???*
प्रमाणिक सुज्ञ ,जिज्ञासू, सौजन्यशील
अधिकारी
बधिर अंन गारद.
वाईटांना आधार अन अभय .
वरदहस्त इडी, सीबीआय,,
बेबंदशाही ,
नीट ,पेपरघोटाळे ,बलात्कार
चंदा गैरप्रकार ,
नहाक, विचारे इमानदार जेरबंद .
शिस्त कधी येणार!?

***गहन प्रश्न** ???*
आज
गाढवांचा नांगर फिरवीणारेच .
अडाणी ,तडीपार होतात हिरो.
कुचकामी विरोधी पक्ष.
खोगीरभर्ति कॅडर ,
पामराचे भुछत्री पक्ष.
क्षीण झाले ,
बहाल पंखातील बळ .
संघटन शक्ती वायफळ.
विधानसभेत,संसदेत
वाया मत,निष्फळ..
स्वार्थी लाचार समाजाची ,
कधी दारूच्या पेल्यातून मुक्ती. अहर्ता कोण पेलणार! “

***ग्रहण प्रश्न**???*
रक्तरंजित क्रांतीने
अन मोठ्या कष्टाने ,
मिळाले स्वातंत्र्य .
मतदान हक्कअधिकार न्यायात दिरंगाई .
खोट.अन् साटलोट,.
स्वविश्वासाला जातो तडा
मागे चालला ,स्वकष्टाने
आणलेला गाडा.
प्रश्नाचा गुंता वाढतो आहे.
सध्या पुरता!!
हिसाब किताब बंद .
मृत्यूची घंटा .
देश रसातळाला जातोय .
मृगजळा मागे धावणाऱ्यानो महासत्ता उन्नती की अधोगती.??
पण ,
भविष्यात पिढी प्रश्न विचारणार आहे .
प्रश्न निर्माण करणारे कोण आहेत?
एक दिवस येईल ,.
सहनशीलता संपली की क्रांतीचा उदय आहेच.. .
एवढे नक्की.!
***गहन प्रश्न** ???*


**मधुबानंदा प्रधान,**
**अकोला**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६

# वारकरी संप्रदाय आणि संवैधानिक मूल्ये - प्रा.साहेबराव सोनकांबळे

जगाच्या पाठीवर भारत देशाला बुद्धाचा देश म्हणून आजतागायत ओळखल्या जाते . त्याचे कारण, तथागत बुद्धांनी अवघ्या विश्वाला शांती समता,करुणा व अहिंसेची शिकवण दिली. हीच शिकवण सबंध मानव जातीला तारणारी आहे हे सर्वमान्य आहे. जगाच्या इतिहासात समतेचा पुरस्कार करणारा प्रथम पुरुष म्हणून तथागत भगवान बुद्धाकडे पाहिले जाते. कारण की तथागत भगवान बुद्धांनी जात, पंथ, लिंगभेद न मानता सर्वांना सामावून घेणारे तत्त्वज्ञान अवघ्या विश्वाला दिले, तेच तत्वज्ञान ‘ बुद्ध तत्त्वज्ञान ‘ म्हणून ओळखले जाते. आजही बहुतांश राष्ट्रांमध्ये बुद्ध तत्त्वज्ञान अंगीकारले जात असल्याचे आपणास पाहावयास मिळते. कालांतराने बुद्धाची ही समतावादी विचारसरणी संपुष्टात आणून विषमतावादी विकृत समाज रचना निर्माण करण्याचे कृत्य काही धर्मांध पंडितांनी केल्याचे दिसून येते. या विचारसरणीतूनच वर्णव्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय,वैश्य,आणि शूद्र या चार वर्णाचा समावेश होता. तत्कालीन वर्णव्यवस्थेच्या नियमावलीनुसार ब्राह्मणाने पूजापाठ मंत्र उच्चार व सर्व धार्मिक विधी करावेत, वैश्यांनी व्यापार उदीम करावा, क्षत्रियांनी हातात शस्त्र,अस्त्र घेऊन लढाया कराव्यात तर शुद्रानी गावकुसाबाहेर राहून वरील तिन्ही वर्णाची सेवा करावी अशी रचना होती. या वर्णव्यवस्थेत शूद्रांना लिहिण्या, वाचण्याचे,मान सन्मानाचे कसलेच स्वातंत्र्य नव्हते. थोडक्यात शूद्रांची अवस्था अत्यंत दयनीय होती. वरील विषमतावादी वर्णव्यवस्था झुगारून समतेचा विचार रुजविण्यासाठी अनेक भारतीय संत महात्म्यांनी व समाज सुधारकांनी प्रयत्न केला. त्यामध्ये संत कबीर, संत रोहिदास, महात्मा बसवेश्वर यांचा नामोल्लेख करणे अगत्याचे ठरेल. हाच समतावादी विचार वारकरी संप्रदायातील अनेक संतांच्या विचारसरणीती आपणास दिसून येतो.मानव मुक्तीसाठी अनेक संतांनी समतेचा लढा उभारल्याचे आपणास पाहवयास मिळते. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरा कुंभार, संत सेना न्हावी, संत सावतामाळी,संत चोखामेळा,संत नरहरी सोनार,संत शेख महंमद आदी संतांचा समावेश होता. तसेच या संत परंपरेत काही स्त्री संतांनी सुद्धा मोलाचे योगदान दिले. त्यामध्ये संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई, संत वेनाबाई,संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई आदी महिलांचा नामोल्लेख प्रकर्षाने करावा लागेल. वरील सर्व संतांनी वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन समतेचा, ममतेचा, मानवतेचा व भक्तीभावाचा संदेश जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न केला. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी इथल्या जातीप्रथा, कर्मकांड,अंधश्रद्धा व ढोंगीपणावर कडाडून हल्ला केला,’” नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी “‘ हे ब्रीद घेऊन कीर्तनाच्या प्रभावी माध्यमातून समाज जागृती करत ज्ञानाचा दीप अखंड तेवत ठेवण्याचे महान कार्य वरील सर्व संतांनी केल्याचे दिसून येते. वारकरी संप्रदाय हा समतेवर आधारित असून त्यामध्ये कुठल्याच प्रकारचा भेदभाव आपणास दिसून येत नाही. संदर्भादाखल संत जनाबाई यांच्या एका अभंगाचा येथे उल्लेख करावासा वाटतो, विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळाचा मेळा ॥ निवृती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ॥ पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ॥ गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ॥ बंका कडेवरी । नामा करांगुळी धरी ॥ जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा॥वरील अंभगातून सर्वधर्म समभाव या तत्वाची जाणीव होते . तसेच अस्पृश्य म्हणून गणल्या जाणाऱ्या महार जातीतील आघाडीचे संत म्हणजेच संत चोखामेळा होत. त्यांनीही आपल्या अभंगातून तत्कालीन धार्मिकतेच्या दांभिकपणावर ताशेरे ओढल्याचे दिसून येते. धावी घाली विठू । आता चालू नको मंद मज मारीती बडवे । काहीतरी अपराध वरील अभंगातून संत चोखामेळा यांनी जातीयतेच्या नावाखाली बडव्यांनी केलेल्या अन्यायाची तक्रार विठोबाकडे केल्याचे दिसून येते. अस्पृश्य जातीत जन्म घेणे हा माझा अपराध आहे का? असा सवालही ते विठ्ठलाला विचारतात. माणूस एखादया निच्च जातीत जन्माला आला म्हणून त्यावरून त्याची सिद्धता ठरविणे हे चुकीचे आहे असाही संदेश संत चोखामेळा आपल्या अभंगातून देतात -ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा ॥कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।काय भुललासी वरलीया रंगा ॥नदी डोंगी परी जळ नोहे डोंगा ।काय भूललासी वरलीया रंगा ॥चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।काय भुललासी वरलीया रंगा ॥हाच मतितार्थ घेऊन जगदगुरु तुकोबाराय यांनीही येथे जातीकुळ अप्रमाण । या अभंगातून जातीयतेवर प्रहार करताना दिसून येतात. अस्पृश्यतेला विरोध करताना त्यांची भूमिका समतेची होती. संत तुकोबाराय यांनी दलित संतांचे दाखले देत समतेची भूमिका मांडली.’’ अंत्यजादि योनि तरल्या हरिभजने । तयाची पुराणे भाट जाली॥ असं तुकोबाराय म्हणतात. चोखोबाराय व संत रोहिदास हे वारकरी परंपरेत वंदनीय मानले गेलेले संत होते.’’ चोखामेळा, बंका जातीया महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी॥ वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास॥ या अभंगाच्या दोन चरणांतून तुकाराम महाराजांनी दलित संतांचे दाखले दिलेले आहेत. वारकरी संप्रदायात दलितांना जो सन्मान मिळाला त्याविषयी एकनाथ महाराज भागवतात लिहितात -छाया देखूनि जग पळे । अंत्यंत मैळे अंत्यज”॥’ तिही धरुनि सत्संगती । आले माझिया पदाप्रतीदेव द्विज तयाते वंदिती । अभिनव कीर्ती संतांची॥यावरून वारकरी संतांची समतेची व बंधुत्वाची शिकवण आपणास जाणवते. थोडक्यात, भारतात रुजलेली बुद्धाची समतावादी विचारसरणी वारकरी संप्रदायातही आपणास दिसून येते. तथागत भगवान बुद्धाच्या समता, बंधुता करुणा, न्याय या विचारांना पुनर्जीवित करण्याचे कार्य वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी केले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. पुढे हाच वारसा जिवंत ठेवून समतेचा पुरस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केल्याचे आपणास दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सखोल अभ्यासांती भारतीय संविधानाच्या माध्यमातून तथागत बुद्धांनी व राष्ट्रसंतांनी पाहिलेले समतेचे, बंधुतेचे व न्यायाचे स्वप्न साकार केले. म्हणूनच आपणास भारतीय संविधानात तथागत बुद्धांनी अंगीकारलेले समतेचे तत्व व संतांनी उभारलेल्या समतेच्या लढ्याची पाळेमुळे दिसून येतात. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी अंधश्रद्धा, कर्मकांड,जातीभेद झुगारुन बुद्धीप्रामाण्यवादी व विज्ञानवादी दृष्टिकोन समाजाला देण्याचे महत कार्य केले. हाच वैज्ञानिक दृष्टिकोन सर्व भारतीयांनी अंगीकारावा हा संदेश मूलभूत कर्तव्याच्या माध्यमातून भारतीय संविधान आपणास देते. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानाच्या माध्यमातून अवघ्या विश्वाचे कल्याण होवो व सर्व प्राणी मात्र सुखी राहोत ही मानवतेची मागणी केली आहे. हाच मानवी कल्याणाचा व प्राणीमात्रावरसुद्धा दया करण्याचा संदेश संविधान आपणास देते . तसेच संत तुकामांनी “ वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती । “ या अभंगातून आपणास निसर्गावर, पक्षी प्राण्यावर प्रेम करा हा अनमोल संदेश दिला. तोच निसर्ग संरक्षणाचा संदेश आपणास संविधानाच्या मूलभूत कर्तव्यात पाहावयास मिळतो. ज्याप्रमाणे तथागत भगवान बुद्धांनी स्त्री-पुरुष हा भेद न मानता स्त्रियांना देखील आपल्या धम्मामध्ये सामावून घेतले तद्वतच वारकरी संप्रदाय देखील स्त्रियांना समतेची वागणूक देताना दिसून येतो. हाच स्त्री-पुरुष समतेचा विचार भारतीय संविधानाने अंगीकारला व स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच मानाचे व सन्मानाचे स्थान दिले. थोडक्यात, हजारो वर्षापूर्वी तथागत भगवान बुद्धांनी व वारकरी संप्रदायातील संतांनी पाहिलेले समतेचे व बंधुत्वाचे स्वप्न भारतीय संविधानाच्या माध्यमातून साकार करण्यासाठी आता फक्त सर्व भारतीयांनी मिळून वारकरी संप्रदायातील संताच्या विचारांचे अनुकरण करणे व भारतीय संविधानातील मूल्ये अंगिकारणे हिच आपली सर्वस्वी जबाबदारी आहे !



**प्रा. साहेबराव सोनकांबळे सावळीकर**
**(सहाय्यक प्राध्यापक पानसरे महाविद्यालय, अर्जापूर ता. बिलोली जि.नांदेड)**
**मो. ९०९६५१५९०१**



## एकजुटीचा संदेश देत निरगुडी ठाकरवाडीत ५ वा जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** अतिशय दुर्गम भागातील निरगुडी बु. ठाकरवाडी ता खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर मधील आदिवासी ठाकर समाजाची संस्कृती, परंपरा, अस्मिता आणि हक्कांचे जतन करण्याचा संदेश देत निरगुडी बु. येथील ठाकरवाडीत ५ वा जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आदिवासी ठाकर समाजाचा एकजुटीचा आणि शिक्षण,व गावातील विकासाच्या माध्यमातून प्रगती करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.ठाकरवाडी हा अतिशय दुर्गम आणि विकासाच्या दृष्टीने मागासलेला भाग असून, येथे मोठ्या प्रमाणावर आदिवासी ठाकर समाजाचे वास्तव्य आहे. विविध मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या या भागातील नागरिकांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपली संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा जपला आहे.९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त ठाकरवाडीत सांस्कृतिक आणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य क्रां राया ठाकर , डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, राघोजी भांगरे,बिरसा मुंडा,विर एकलव्य,महाराणा प्रताप, सावित्रीबाई फुले यांना पूजन करून आदिवासी समाजाच्या परंपरेला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रॅली काढून "एकजूट, शिक्षण आणि संघर्षातून विकास" असा संदेश देण्यात आला.यावेळी आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाबाबत चर्चा करण्यात आली. आपल्या हक्कांसाठी संघटित होण्यासोबतच मुलांनी शिक्षण घेऊन समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पांडुरंग मधे (सरपंच ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बु/खु), प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर चे माजी सभापती भिमराव खंडागळे गावाचे प्रतिष्ठित व्यक्ती श्री रामचंद्र मधे ग्रामपंचायत च्या ग्रामसेविका श्रीमती भारती पाटील, ग्रामपंचायत चे ऑपरेटर श्री दिपक चांडे, ग्रामपंचायत चे सदस्य धरम काकस,जनाबाई मधे, पोलिस पाटील गंगाराम मेंगाळ, ग्रामस्थ, बबन कातवारे ,बाळू मधे,सोमिनाथ मेंगाळ, पांडुरंग मधे, साहेबराव मेंगाळ, तुकाराम मेंगाळ, कडूबा गांगड,तुकाराम बांगारे,सुनिल गावंडे, कृष्णा गावंडे,गणपत पारधे, राधाकृष्ण मेंगाळ,सुनिल मधे, सनिराम मधे,लक्ष्मण पारधे,जयराम उघडे, ढवळीराम मेंगाळ,ढवळीराम पथवे, अशोक माळे ,सनिराम मेंगाळ लक्ष्मण मेंगाळ, शिवनाथ गांगड,युवक, वाळूबा मेंगाळ, वाळूचा मधे, प्रल्हाद मेंगाळ,पुनम मेंगाळ, रंगनाथ मेंगाळ,नवनाथ अगिवाले ,सोमनाथ मेंगाळ,बुधा मधे,हिरामण मधे,महिला वंदना मेंगाळ ,सविता मेंगाळ, सखुबाई मधे, यशोदाबाई गांगड,कलाबाई मधे, उज्वला गावंडे, अंगणवाडी सेविका निर्मला घोंगते,अमिता भागडे, राधाबाई गावंडे,भागुबाई पारधे रुक्मिणीबाई हिवाळे विद्यार्थी तसेच आदिवासी ठाकर समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवत उत्साहपूर्ण वातावरणात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला."जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करत शिक्षण व एकजुटीच्या बळावर आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणूया," असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## श्री संत सावता माळी महाविद्यालयात कै. रावसाहेब पाटील दांडगे यांची पुण्यतिथी साजरी



*यावेळी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी केले.यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.*

**फुलंब्री :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री याठिकाणी सांस्कृतिक विभागाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. रावसाहेब पाटील दांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कै. रावसाहेब पाटील दांडगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. महेश थोरात यांनी कै. रावसाहेब दांडगे यांच्या जीवनकार्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. बोलत असताना डॉ. थोरात म्हणाले की, कै. रावसाहेब दांडगे यांनी समाजसेवा, शिक्षण, कृषी, ग्रामविकास आणि लोककल्याण यांच्या उन्नतीसाठी कार्य केले. त्यांनी या कार्यक्षेत्रापैकी कोणत्याही एका कार्यक्षेत्राला मर्यादित ठेवले नाही. तर गावाच्या विकासापासून सहकारापर्यंत, शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून ते शिक्षणापर्यंत, ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेपर्यंत आणि स्थानिक नेतृत्वापासून ते राजकीय संघटनेपर्यंत त्यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवलेली आहे. ग्रामविकासाला केवळ शासकीय योजनांची जोड पुरेशी नाही, तर स्थानिक नेतृत्व, सहकार आणि लोकसहभाग आवश्यक असतो. हा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केला. सहकार क्षेत्राची पायाभरणी करत असताना कै. रावसाहेब दांडगे यांनी ग्रामीण समाज आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावा, त्यांना संघटित व्यासपीठ मिळावे. आणि स्थानिक पातळीवर विकासाची साधने निर्माण व्हावीत. यासाठी त्यांनी सहकाराचा मार्ग स्वीकारला. व यातूनच समाज, राष्ट्र आणि देशाचा विकास साधला जाईल. हा विचार पुढे ठेवून कै. रावसाहेब दांडगे यांनी कार्य केलेले आहे. असे मत व्यक्त केले.

## माधवराव पाटील महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती व ग्रंथालय दिन साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील माधवराव पाटील महाविद्यालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १३४ वी जयंती व राष्ट्रीय ग्रंथालय दिन बुधवारी (ता. १२) रोजी साजरा करण्यात आली. प्रारंभी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते प्रथमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्ट, डॉ. रवींद्र गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुजित मटकरी, डॉ .राम बजगिरे, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. सायबण्णा घोडके, डॉ. अविनाश मुळे, प्रा . राजकुमार तेलंग, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६


## जिंतूर नगरपरिषदेत राष्ट्रध्वज वितरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : देशाचा १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, जिंतूर शहरात स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाची तयारी सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर जिंतूर नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांसाठी राष्ट्रीय ध्वज वितरणाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. नगरपरिषद कार्यालयात नागरिकांना राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्यात येत असून, शहरातील नागरिकांकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.जिंतूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय ध्वज वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयात येऊन नियमानुसार शुल्क भरून आपला भारतीय राष्ट्रध्वज घेऊन जावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.'हर घर तिरंगा' उपक्रमाला बळस्वातंत्र्य दिनानिमित्त प्रत्येक घरावर तिरंगा फडकवून देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने नगरपरिषद प्रशासनाकडून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी राष्ट्रध्वज खरेदी करून आपल्या घरावर सन्मानपूर्वक तिरंगा फडकवावा आणि स्वातंत्र्य दिनाचा उत्सव उत्साहात साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.राष्ट्रध्वज हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचे प्रतीक असल्याने त्याचा सन्मान राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे ध्वजाचा योग्य प्रकारे वापर करून राष्ट्रध्वज संहितेचे पालन करण्याचे आवाहनही नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात येत आहे.नगरपरिषद कर्मचारी नागरिकांच्या सेवेतनागरिकांना राष्ट्रध्वज सहज उपलब्ध व्हावा यासाठी नगरपरिषद कार्यालयात कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. लक्ष्मण तळेकर, भगवान डोईफोडे, इंजि. नेव्हल, यशोदा वाकळे, सय्यद वसीम, मयूर बाहेगव्हाणकर, अरुण नेटके यांच्यासह नगरपरिषदेचे कर्मचारी नागरिकांना राष्ट्रध्वज वितरित करण्यासाठी उपस्थित आहेत.स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, तसेच देशाच्या स्वातंत्र्याचा उत्सव अभिमानाने आणि उत्साहात साजरा करावा, असे आवाहन जिंतूर नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

## रक्तदानातून मानवतेचा संदेश; तिसगाव आश्रमशाळेत रक्तदान शिबिर




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते रक्तदान शिबिरात 22 रक्तदात्यांनी रक्तदान देऊन समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आपण केलेल्या रक्तदानामुळे नक्कीच कुणाचा तरी जीव वाचेल कुणाला तरी जीवदान मिळेल याची जाणीव ठेवून शासकीय आश्रमशाळा तिसगाव येथील कर्मचारी व पालकांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे आयोजन एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम व सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रशासन श्री भगत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव व दत्ताजी भाले रक्तपेढी हेडगेवार रुग्णालय गारखेडा परिसर छत्रपती संभाजी नगर यांच्या सहकार्याने करण्यात आले होते रक्तदान हे सर्वोच्च सामाजिक दान मानले जाते रक्तदान केल्याने अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात या भावनेने सामाजिक बांधिलकी जोपासली जोपासली जाते यातून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व लक्षात आले या शिबिरासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिगंबर खालापुरे सहशिक्षक दिनेश परदेशी, मनीषा सानप, योगेश ठाकूर, भागवत डोंगरे, पंढरीनाथ धोंडकर, भरत भावसार अधीक्षक श्रीहरी कांगणे अधीक्षिका उज्वला गोळेगावकर, सुनिता माळी, नारायण सोनवणे संजय मधे, सनिराम गावंडे, लखन राठोड, रामराजे राठोड, अनिल करपे, नारायण करपे, रेखा लोखंडे, नफिसा सय्यद, सुनिता माळी वैभव खिल्लारे, बाबासाहेब विधाते, सीता अतकरे, ठाकर वाडीतील ग्रामस्थ पुनम में◌ंगाळ,बाळू मधे,भिमराव मधे,तुकाराम मधे,योगेश कातवारे,संजय मेंगाळ, ज्ञानेश्वर पारधे, कृष्णा गावंडे,दत्तु गांगड, आदींनी परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी केले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)**
**विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६

# विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभा १८५७ चा औरंगाबाद

## १८५७ च्या प्रथम स्वतंत्रलढ्यातील छत्रपती संभाजीनगरचे(औरंगाबाद) दुर्लक्षित योगदान

दरवर्षी साजरा होणारा स्वातंत्र्यदिन आपल्याला राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याची आठवण करून देतो. या दिवशी आपण स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाची आठवण करतो, स्वातंत्र्याच्या मूल्यांचा गौरव करतो. पण प्रत्येक ऐतिहासिक घटना समाजाच्या स्मरणात कायम राहत नाही. काही घटना राष्ट्राच्या सामूहिक स्मृतीचा भाग बनतात, तर काही काळाच्या ओघात विस्मृतीत जातात.आजच्या छत्रपती संभाजीनगरचा १८५७ मधील इतिहास हा अशाच दुर्लक्षित अध्यायांपैकी एक आहे. स्वातंत्र्यलढ्याचे स्मरण करताना आपल्या शहराच्या योगदानाची आठवण आपण आजही जिवंत ठेवली आहे का? हा प्रश्न केवळ इतिहासापुरता मर्यादित नाही तो आपल्या ऐतिहासिक जाणिवेचा आणि सामूहिक स्मृतीचाही आहे. या शहराला इतिहासाचा अभाव नाही उलट समृद्ध ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. प्रतिष्ठानची प्राचीनता, देवगिरीचे वैभव, मलिक अंबरने केलेले नगरनियोजन, मुघलांचा प्रभाव, आसफजाही राजवट आणि अजिंठा-वेरूळचा जागतिक वारसा यामुळे औरंगाबादला मोठी ऐतिहासिक ओळख मिळाली आहे. या इतिहासाचा आपल्याला अभिमानही आहे. मात्र या समृद्ध इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आज फारसा चर्चेत दिसत नाही. तो म्हणजे १८५७ च्या प्रथम स्वातंत्र्यलढ्यात औरंगाबादने बजावलेली भूमिका. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास म्हटला की मेरठ, दिल्ली, कानपूर, झाशी, लखनौ आणि ग्वाल्हेर ही नावे सहजपणे आठवतात. शालेय शिक्षणापासून लोकप्रिय इतिहासापर्यंत याच केंद्रांचा उल्लेख अधिक आढळतो. त्यामुळे दख्खनमध्ये, विशेषतःऔरंगाबादमध्येही या संघर्षाचे पडसाद उमटले होते, ही बाब अनेकांच्या जाणिवेबाहेर राहिली. मात्र "गॅझेटियर ऑफ द निजाम्स डॉमिनियन्स (१८८४)" इतिहासकार वि. गो. खोबरेकर यांचे *महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढे*, डॉ. दुलारी कुरेशी आणि रफत कुरेशी यांचे *औरंगाबादनामा* तसेच सेतू माधवराव पगडी आणि भुजंगराव कुलकर्णी यांच्या लेखनातून औरंगाबादनेही या संघर्षात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते, हे स्पष्ट होते.ही बाब समजून घेण्यासाठी शहराच्या ऐतिहासिक प्रवासाकडे थोडक्यात पाहणे आवश्यक आहे. सतराव्या शतकाच्या प्रारंभी 'खडकी' या छोट्याशा वस्तीला अहमदनगरच्या निजामशाहीचा दूरदर्शी वजीर मलिक अंबर याने नियोजनबद्ध शहराचे रूप दिले. नहरींद्वारे पाणीपुरवठा, नियोजित बाजारपेठा, प्रशस्त हवेल्या, उत्तम प्रशासकीय व्यवस्था आणि व्यापारी विकास यांमुळे हे शहर अल्पावधीतच दख्खनच्या राजकीय नकाशावर ठळकपणे उभे राहिले. पुढे मुघल साम्राज्याच्या विस्तारानंतर औरंगाबाद दख्खनमधील महत्त्वाचे लष्करी आणि प्रशासकीय केंद्र बनले. आसफजाही राजवटीत राजधानी हैदराबादला गेली, तरी शहराचे सामरिक महत्त्व अबाधित राहिले.पुढील काळात ब्रिटिश सैन्याची छावणी येथे असल्यामुळे जेव्हा १८५७ मध्ये मेरठ येथे उठावाची ठिणगी पडताच तिचे पडसाद औरंगाबादपर्यंत पोहोचणे अपरिहार्य होते. **मोमिनाबादहून (अंबाजोगाई) आलेल्या घोडदळाच्या पलटणीचा मुक्काम पिंपळगाव येथे झाला. याच ठिकाणी उत्तर भारतातील उठावाच्या बातम्या सैनिकांपर्यंत पोहोचल्या आणि दिल्लीला जाण्याबाबत त्यांच्यात चर्चा सुरू झाली. या बातम्यांमुळे सैनिकांमधील असंतोष अधिक तीव्र झाला.**

त्या वेळी याठिकाणी असणाऱ्या सैनिकांमध्ये अस्वस्थता आणि ब्रिटिश धोरणांविषयी संशय वाढला. दिल्लीतील उठाव दडपण्यासाठी आपल्यालाच उत्तर भारतात पाठविण्यात येणार असल्याची चर्चा पसरताच असंतोष तीव्र झाला. अनेक सैनिकांच्या दृष्टीने हा केवळ सेवाशर्तींचा प्रश्न नव्हता तो स्वाभिमान, निष्ठा आणि राजकीय जाणिवेचा विषय होता. आपण ज्या अटींवर सैन्यात दाखल झालो, त्या मोडून दिल्लीच्या बादशहाविरुद्ध शस्त्र उचलणे योग्य नाही, अशी त्यांची भावना होती या संपूर्ण घडामोडीतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या असंतोषाला धार्मिक स्वरूप नव्हते. उपलब्ध नोंदींनुसार हिंदू आणि मुस्लीम सैनिकांनी गुप्त बैठका घेतल्या, परस्पर निष्ठेच्या शपथा घेतल्या आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध एकत्र राहण्याचा निर्धार केला. त्यामुळे औरंगाबादमधील हा उठाव राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो. ब्रिटिश अधिकाऱ्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले होते. सैनिकांची समजूत घालण्याचे प्रयत्न झाले मात्र असंतोष कमी झाला नाही. अधिकाऱ्यांच्या कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. छावणीवर हल्ला होणार, अशा अफवा पसरल्या. भीती आणि संशयाच्या वातावरणात संघर्ष अटळ असल्याचे स्पष्ट होऊ लागले. याच काळात झालेल्या मुसळधार पावसाची आणि घोडदळाचे निशाण कोसळल्याची नोंद काही समकालीन वृत्तांतांत आढळते. सैनिकांनी त्याकडे अपशकुन म्हणून पाहिल्याचाही उल्लेख मिळतो.परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच हैदराबाद आणि पुणे येथून अतिरिक्त सैन्य औरंगाबादला पाठविण्यात आले. मेजर जनरल वुडबर्न यांच्या नेतृत्वाखाली तोफखाना, युरोपीय सैन्य आणि इतर पलटणी शहरात दाखल झाल्या. **खाम नदीवरील 'लोखंडी पूल' हे या काळात महत्त्वाचे धोरणात्मक ठिकाण होते. शहराशी असलेला संपर्क आणि सैन्याच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी या पुलावरही सैन्य तैनात करण्यात आले. २३ जून १८५७** हा दिवस औरंगाबादच्या इतिहासातील निर्णायक दिवस ठरला. सर्व सैनिकांना रांगेत उभे करण्यात आले. ब्रिटिश सत्तेशी निष्ठा राखणाऱ्यांना वेगळे होण्याचे आदेश देण्यात आले आणि संशयित बंडखोरांची नावे पुकारण्यास सुरुवात झाली.याच वेळी **आमेर खान** यांचे नाव पुकारण्यात आले. काही समकालीन वृत्तांतांनुसार त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना प्रतिकाराचा इशारा दिला. छावणीत गोंधळ उडाला. काही सैनिकांनी प्रतिकाराचा प्रयत्न केला, तर काहींनी माघार घेतली. मात्र ब्रिटिश सैन्याची तयारी अधिक भक्कम असल्यामुळे उठाव व्यापक स्वरूप धारण करण्यापूर्वीच दडपण्यात आला.या संघर्षातील सर्वाधिक स्मरणात राहिलेले नाव म्हणजे **मीर फिदा अली.** त्यांनी कॅप्टन एच. डी. ॲबट यांच्यावर गोळी झाडून उघड प्रतिकार केला. गोळीचा नेम चुकला मात्र त्या एका कृतीने औरंगाबादच्या उठावाची दिशा स्पष्ट झाली. त्यानंतर त्यांना पकडण्यात आले. त्यांच्या सोबत अनेक सैनिकांना अटक करून निःशस्त्र करण्यात आले. उपलब्ध नोंदींनुसार त्यात रिसालदार, जमादार, दफेदार, तुतारीवाले आणि मोठ्या संख्येने सैनिकांचा समावेश होता.उठाव दडपल्यानंतर कठोर दडपशाही सुरू झाली. लष्करी न्यायालयांत झटपट खटले चालविण्यात आले. मीर फिदा अली यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांच्यासह अनेक सैनिकांना फाशी देण्यात आली, काहींना तोफेच्या तोंडी देण्यात आले, तर अनेकांना गोळ्या घालण्यात आल्या किंवा जन्मठेपेची शिक्षा झाली. **औरंगाबादनामा मध्ये डॉ. दुलारी कुरेशी आणि रफत कुरेशी यांनी मीर फिदा अलींसह शेख रहीम, जामबाज खान, दिलावर खान, मीर मजहर अली, मीर इमाम अली, हाशीम अली, फैज मोहम्मद खान आणि इतर अनेक हुतात्म्यांचा उल्लेख केला आहे.** विविध स्रोतांमध्ये शिक्षांची संख्या आणि काही तपशीलांत मतभेद आढळतात मात्र औरंगाबादमध्ये मोठ्या प्रमाणावर सैनिकांना मृत्युदंड देण्यात आला, याबाबत इतिहासकारांचे मत एकमताने नोंदलेले दिसते. **डॉ. रमजान यांच्या अभ्यासानुसार, "या उठावात सहभागी असलेल्या तीन क्रांतिकारकांना तोफेच्या तोंडी बांधून पैठण गेटपासून काळा चबुतऱ्यापर्यंत नेण्यात आले. या वेळी रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. काळा चबुतरा येथे पोहोचल्यानंतर या तिघांना तोफेने उडवून देण्यात आले, तर इतर २१ जणांना फाशी देऊन किंवा गोळ्या घालून ठार मारण्यात आले."**

**काळा चबुतरा**. मात्र या स्थळाचा इतिहास १८५७ पासून सुरू होत नाही. मलिक अंबरच्या काळात उभारलेला हा चबुतरा शहराच्या सार्वजनिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होता. येथे हत्तींच्या झुंजी, कुस्तीचे सामने आणि सार्वजनिक कार्यक्रम भरत असत. पुढे इतिहासाने या जागेचे स्वरूप बदलले. करमणुकीचे केंद्र असलेला काळा चबुतरा स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या बलिदानाची साक्ष देणारी भूमी बनला. एका वास्तूचे स्मृतीस्थळात झालेले हे रूपांतर औरंगाबादच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. स्वातंत्र्यानंतर या परिसराचे **क्रांती चौक** असे नामकरण करण्यात आले. भुजंगराव कुलकर्णी यांनी मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र या आत्मचरित्रात नमूद केल्याप्रमाणे, १८५७ च्या शताब्दी वर्षानिमित्त हा निर्णय घेण्यात आला. पुढे येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आणि आज उंच राष्ट्रध्वज या परिसराची नवी ओळख बनला आहे. मात्र या बदलांपेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न आजही तसाच आहे. **या चौकाला 'क्रांती चौक' का म्हणतात, हे आज किती नागरिकांना माहीत आहे?** मीर फिदा अली, आमेर खान किंवा काळा चबुतरा या नावांमागील इतिहास आजच्या पिढीपर्यंत कितपत पोहोचला आहे? छत्रपती संभाजीनगरने आपल्या १८५७ च्या वारशाचा सन्मान केला आहे की तो केवळ स्मारकांच्या पातळीवर मर्यादित राहिला आहे? आज क्रांती चौक आपल्या शहराचा केंद्रबिंदू आहे, सार्वजनिक कार्यक्रमांचे प्रमुख ठिकाण आहे परंतु त्या भूमीवर बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण आपल्या सार्वजनिक जीवनाचा भाग आहे का? शाळांच्या अभ्यासक्रमात, महाविद्यालयांच्या इतिहास विभागात, महानगरपालिकेच्या सांस्कृतिक उपक्रमांत, सामाजिक संस्थांच्या स्मृतिदिनांत किंवा शहराच्या सामूहिक जाणिवेत या अध्यायाला त्याचे योग्य स्थान मिळाले आहे का? हा प्रश्न कोणत्याही एका संस्थेला उद्देशून नाही. तो या शहराच्या इतिहासावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला विचारलेला आहे.कारण एखाद्या शहराची खरी ओळख त्याच्या स्मारकांत नसते ती त्याच्या स्मृतीत असते. स्मारके उभारणे सोपे असते, पण स्मृती जिवंत ठेवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतात. आज छत्रपती संभाजीनगरकडे इतिहासाचा अमूल्य वारसा आहे मात्र तो सार्वजनिक जाणिवेचा भाग होताना दिसत नाही. ही उदासीनता बदलणे ही केवळ इतिहास अभ्यासकांची जबाबदारी नाही. महानगरपालिका, विद्यापीठे, शाळा-महाविद्यालये, सामाजिक संस्था, प्रसारमाध्यमे आणि नागरिक या सर्वांची ती सामूहिक जबाबदारी आहे. या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाला अभिवादन करताना आपल्या शहरासाठी प्राण अर्पण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांचे स्मरणही तितकेच आवश्यक आहे. कारण इतिहासाचा वारसा केवळ जतन करण्यासाठी नसतो तो पुढील पिढीपर्यंत अभिमानाने पोहोचविण्यासाठी असतो. छत्रपती संभाजीनगरने अजिंठा-वेरूळ, देवगिरी आणि मलिक अंबर यांचा वारसा जसा जपला, तसाच १८५७ मधील स्वातंत्र्यसमरातील आपल्या योगदानाचाही सन्मान केला तरच या शहराचा इतिहास पूर्णत्वाला जाईल. अन्यथा इतिहास आपल्याकडे असेल पण त्याची जाणीव नसेल. आणि कोणत्याही शहरासाठी त्यापेक्षा मोठी शोकांतिका दुसरी असू शकत नाही.



**शेख इरफान अय्युब**
(सहा.प्राध्यापक इतिहास विभाग)
डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन
छत्रपती संभाजीनगर,४३१००१
ईमेल- iasirfan82@gmail.com